ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजना राबविताना गावातील जुन्या योजनांच्या उपांगांचा वापर करण्याबाबत..

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-११०८/प्र.क्र.२१४/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २९ नोव्हेंबर, २००८**

**प्रस्तावना :-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नवीन योजना मंजूर करताना त्याच गावात जर यापूर्वी केलेली जुनी योजना असेल आणि त्या योजनेची उपांगे उत्तम स्थितीत असून ती नवीन योजनेवर वापरता येणे शक्य असले तरी जुन्या योजनेची उपांगे नवीन योजनेवर वापरण्यात येत नाहीत. शासन निधीची बचत करणे आणि आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने हे योग्य नाही. सबब, याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन असा आदेश देत आहे की, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नवीन योजना मंजूर करताना त्याच गावात जर यापूर्वी केलेली जुनी योजना असेल आणि त्या योजनेची उपांगे उत्तम स्थितीत असून ती नवीन योजनेवर वापरता येणे शक्य असल्यास या उपांगांचा वापर नवीन योजनेत करण्यात यावा.

नवीन योजना मंजूर करताना गावात जूनी योजना आहे का, असल्यास त्या योजनेची उपांगे नवीन योजनेकरीता वापरण्यायोग्य आहेत किंवा कसे, योजनेच्या अनुषंगाने गावात उपलब्ध असलेल्या इतर बाबी यांचा विचार करण्यात यावा. जुन्या योजनेची माहिती नवीन योजनेच्या प्रस्तावामध्ये सविस्तर नमुद करावी.

जुन्या योजनेतील वापरण्यायोग्य उपांगांचा उपयोग नवीन योजनेत करण्यात न आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल

या संदर्भात काही अडचणी उद्‌भवल्यास संबंधित जिल्हा परिषदेचे / शासनाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००८१२०४१५११४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्री. श्री. घोलप)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

-----